# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**मराठी विभाग – जागतिक महिला दिन**

सकाळ
पुणे, शनिवार
१० मार्च २०१८
४

# राजगुरुनगरला आत्मनिर्भरतेची शपथ



राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आत्मनिर्भरतेची शपथ घेताना विद्यार्थिनी.

राजगुरुनगर, ता. ९ : "माया, ममता, जिव्हाळा आणि शक्ती, युक्ती, बुद्धी यांचा मिलाफ म्हणजे स्त्रीत्व असून, जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा," असे मत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयात मराठी विभागातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांच्या समारोपप्रसंगी बोलत होते. या वेळी डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एम. एल. मुळूक, प्रा. व्ही. व्ही. कावळे, डॉ. व्ही. वाय. रासकर, प्रा. गणेश घुमाळ, प्रा. संदीप बोरात, प्रा. संदीप ढोरे, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते. महाविद्यालयात महिला दिनानिमित्त जागर जाणिवा अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कल्याणी दौंडकर, अश्विनी थाडगे, कीर्ती कोहिनकर, सोनाली पांढरे, शीतल पुजवळ, अंकिता पोखरकर, प्रतीक्षा पाटोळे, मयूरी मेद, दीपाली डमाले, निकिता बनकर, प्राजक्ता मांजरे, पूजा सांडभोर, ऋतुजा वाळुंज या विविध स्पर्धा विजेत्या विद्यार्थिनींना साधना साप्ताहिकाचा महिला दिन विशेषांक देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी कोमल गायकवाड, अक्षदा थाप, प्राजक्ता गवारे या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली.

आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. व्ही. व्ही. कावळे यांनी केले. प्रा. एम. एल. मुळूक यांनी आभार मानले.

१२ पुढारी | पुणे, शनिवार १० मार्च २०१८

# स्त्रियांकडे आदरयुक्त भावनेने पाहण्याची गरज : डॉ. संजय शिंदे

राजगुरूनगर : प्रतिनिधी

आपल्या कुटुंब व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी स्त्रिया जबाबदारीने पार पाडत असतात. त्यामुळे स्त्रियांकडे आदरयुक्त व समानतेच्या भावनेने पाहण्याची गरज आहे, असे मत हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी व्यक्त केले.

महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त शिंदे बोलत होते. डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एम. एल. मुळुक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे, डॉ. व्ही. वाय. रासकर, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात, प्रा. संदीप ढोले, प्रा. गणेश मोढवे यावेळी उपस्थित होते.

जागतिक महिला दिन हा स्त्रीयांचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा. महाविद्यालयीन शिक्षण घेताना विद्यार्थिनींनी आपल्या व्यक्तिमत्वाचा अर्थ समजून घेऊन आपल्या अस्मितेचा सार्थ अभिमान बाळगायला हवा. स्वत:मधील दुर्बलता बाजूला सारून स्वबळावर भरारी घेण्याचे स्वप्न पाहताना आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्राधान्याने विचार करायला हवा, असे आवाहनही डॉ. शिंदे यांनी यावेळी केले.



महिलादिनानिमित्त सक्षमीकरणाची शपथ घेताना महिला.

जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयात १ ते ८ मार्चदरम्यान जागर जाणिवा अभियानांतर्गत 'काळाच्या पुढे असणाऱ्या स्त्रिया' या विषयावर परिसंवाद, 'उंच माझा झोका' या विषयावर मुक्त संवाद, स्त्रीवादी साहित्याची ओळख यासारखे विविध उपक्रम राबविण्यात आले. 'उंच माझा झोका' या विषयावरील मुक्त संवादात विद्यार्थिनींनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करून स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता व्यक्त केली. या सर्व उपक्रमात १०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

कल्याणी टोंकर, अश्विनी पाडळे, कीर्ती कोहिणकर, सोनाली थांबे, शीतल भुजबळ, अंकिता पोखरकर, प्रतीक्षा पाटोळे, मधुरी सैद, दीपाली इनाले, निकिता बनकर, प्राजक्ता मांजरे, पूजा सांडभोर, ऋतुजा वाजुंज या विजेत्या विद्यार्थिनींना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांनी केले. प्रा. एम. एल. मुळुक यांनी आभार मानले.

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ९ मार्च २०१८ 05

# समान हक्क, स्वातंत्र्य हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार

## डॉ. संजय शिंदे : जागतिक महिलादिनी आत्मनिर्भरतेची घेतली विद्यार्थिनींनी शपथ

राजगुरुनगर, दि. ८ (प्रतिनिधी) - आपली कुटुंबसंस्था स्त्रियांचा त्याग व समर्पणावर उभी असून कुटुंब व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी त्या अत्यंत जबाबदारीने पार पाडत असतात. त्यामुळे स्त्रियांकडे पाहताना आदर व समानतेच्या भावनेने पाहायला हवे. तसेच समान हक्क, संधी, दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार असून केवळ स्त्री म्हणून होणारे अवमूल्यन व शोषणाची त्यांना जाणीव व्हायला हवी, असे प्रतिपादन कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी राजगुरुनगर येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांच्या समारोपप्रसंगी बोलत होते. या वेळी डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एम. एल. मुळुक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे, डॉ. व्ही. वाय. रासकर, प्रा. गणेश धुमाळ, प्रा. संदीप थोरात, प्रा. संदीप ढोले, प्रा. गणेश मोढवे उपस्थित होते.

### जागर जाणीवांचा अभियान

दि. १ ते ८ मार्च दरम्यान जागर जाणिवांचा अभियानांतर्गत 'काळाच्या पुढे असणाऱ्या स्त्रिया' या विषयावर परिसंवाद, 'उंच माझा झोका' या विषयावर मुक्त संवाद, मी मुलगी बोलतेय, स्त्रीभ्रूण हत्या एक सामाजिक कलंक, मुलगी शिकली प्रगती झाली, मला काय हवं! या विषयांवर निबंध स्पर्धा, आदि उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले ते ताराबाई शिंदे यांच्यापासून विभावरी शिरूरकर ते मलिका अमर शेख या लेखिकांनी घेतलेला स्त्रियांच्या विविध प्रश्नांचा शोध व व्यक्त केलेले स्त्रीविशिष्ट अनुभवांची माहिती मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थिनींना दिली. उंच माझा झोका या विषयावरील मुक्त संवादात विद्यार्थिनींनी स्वत:ची स्वतंत्र ओळख निर्माण करून स्वयंपूर्ण होण्याची आवश्यकता व्यक्त केली.

यावेळी डॉ. शिंदे म्हणाले, महिलांना संधी मिळाल्यावर प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले असल्याने जागतिक महिला दिन हा स्त्रीयांचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा. महाविद्यालयीन शिक्षण घेताना विद्यार्थिनींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ समजून घेऊन आपल्या अस्मितेचा सार्थ अभिमान बाळगायला हवा.

स्वत:मधील दुर्बलता बाजूला सारून स्वबळावर भरारी घेण्याचे स्वप्न पाहताना आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्राधान्याने विचार करायला हवा. या सर्व उपक्रमात १०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या. कल्याणी टोंकर, अश्विनी पाडळे, कीर्ती कोहिणकर, सोनाली थांबे शितल भुजबळ, अंकिता पोखरकर, प्रतीक्षा पाटोळे, मधुरी सैद, दिपाली इनाले, निकिता बनकर, प्राजक्ता मांजरे, पूजा सांडभोर, ऋतुजा वाजुंज या विविध स्पर्धा विजेत्या विद्यार्थिनींना महिला दिन विशेषांक देऊन गौरविण्यात आले. भाग्यश्री कोमल गायकवाड, अक्षदा वाघ, प्राजक्ता गटदे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांनी केले तर प्रा. एम. एल. मुळुक यांनी आभार मानले.



राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात विद्यार्थिनींना आत्मनिर्भरतेची शपथ देण्यात आली.

लोकमत पुणे, शुक्रवार, दि. ९ मार्च २०१८ ३

# स्त्रियांच्या समर्पणावर कुटुंबव्यवस्था

राजगुरुनगर : आपली कुटुंबसंस्था स्त्रियांच्या त्याग व समर्पणावर उभी असून, कुटुंब व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी त्या अत्यंत जबाबदारीने पार पाडत असतात. त्यामुळे स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता आदर व समानतेच्या भावनेने पाहायला हवे, असे मत उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एस. एल. मुळूक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे, डॉ. व्ही. वाय. रासकर, प्रा. गणेश घुमाळ, प्रा. संदीप थोरात, प्रा. संदीप खैरे, प्रा. गणेश गोडवे उपस्थित होते. शिंदे म्हणाले की, महिलांना संधी मिळाल्यावर प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा. समान हक्क, संधी, दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार आहे. जागर जाणिवा अभियानांतर्गत काळाच्या पुढे असणाऱ्या स्त्रिया या विषयावर परिसंवाद, रंग माझा झोका या विषयावर मुक्तसंवाद, स्त्रीवादी साहित्याची ओळख, मी मुलगी बोलतेय, स्त्रीभ्रूणहत्या एक सामाजिक कलंक, मुलगी शिकली प्रगती झाली, फक्त काय हवं! या विषयांवर निबंध स्पर्धा, या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांमध्ये ३०० पेक्षा अधिक विद्यार्थिनी सहभागी झाल्या. विद्यार्थिनींना साधना साप्ताहिकाचा महिला दिन विशेषांक देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थिनींनी यावेळी मनोगतही व्यक्त केले. विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. एस. एल. मुळूक यांनी मानले.

केसरी पुणे, ९ मार्च २०१८ ५

# महिला दिनानिमित्त राजगुरू महाविद्यालयात जागर जाणिवा अभियान

राजगुरुनगर, (वार्ताहर) : आपली कुटुंबसंस्था स्त्रियांचा त्याग व समर्पणावर उभी असून कुटुंब व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी त्या अत्यंत जबाबदारीने पार पाडत असतात. त्यामुळे स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता आदर व समानतेच्या भावनेने पाहायला हवे, असे मत कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी मांडले. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ. बी. डी. अनुसे, प्रा. एस. एल. मुळूक, प्रा. व्ही. व्ही. कांबळे, डॉ. व्ही. वाय. रासकर, प्रा. गणेश घुमाळ, प्रा. संदीप थोरात, प्रा. संदीप खैरे, प्रा. गणेश गोडवे उपस्थित होते.

डॉ. शिंदे म्हणाले, महिलांना संधी मिळाल्यावर प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले असल्याने जागतिक महिला दिन हा स्त्रीत्वाचा उत्सव म्हणून साजरा व्हायला हवा. महाविद्यालयीन शिक्षण घेताना विद्यार्थिनींनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा अर्थ समजून घेऊन आपल्या अस्मितेचा सार्थ अभिमान बाळगायला हवा. समान हक्क, संधी, दर्जा आणि स्वातंत्र्य हा स्त्रियांचा मूलभूत अधिकार असून केवळ स्त्री म्हणून होणारे अवमूल्यन व शोषणाची त्यांना जाणीव व्हायला हवी, असे सांगितले. दरम्यान कल्याणी दौंडकर, अश्विनी घाडगे, कीर्ती कोहिनकर, सोनाली भांबुरे, शितल भुजबळ, अंकिता पोखरकर, प्रतीक्षा पाटोळे, माधुरी सैद, दिपाली ढमाले, निकिता बनकर, प्राजक्ता मांजरे, पूजा सांडभोर, ऋतुजा वाळुंज या विविध स्पर्धांविजेत्या विद्यार्थिनींना साधना साप्ताहिकाचा महिला दिन विशेषांक देऊन गौरविण्यात आले. तर विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या आत्मनिर्भरतेच्या शपथेचे वाचन प्रा. व्ही. व्ही. कांबळे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख